

वसंतराव मगदूम यांच्या शिवज्योत पुस्तक प्रकाशन कार्यक्रमप्रसंगी डावीकडून सुनील देसाई, वसंतराव मगदूम, अंजली दमानिया, डॉ. डी. टी. शिर्के, विलास नांदवडेकर आदी.

# भ्रष्टाचारविरोधी आवाज बुलंद करा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## अंजली दमानिया; 'शिवज्योत' पुस्तकाचे प्रकाशन

'समाजात भ्रष्टाचाऱ्यांची संख्या वाढत आहे हे वास्तव बदलण्याची ताकद भ्रष्टाचाराला ठणकावून विरोध करणाऱ्यांमध्ये आहे. जे नियमबाह्य आहे, कायद्याविरोधात आहे ते ठामपणे चूक म्हणण्याची हिंमत सर्वसामान्य नागरिकांनी समाजात दाखवली पाहिजे. भ्रष्टाचारविरोधी आवाज बुलंद झाला तर कायद्याची जरब बसेल. कर्मचाऱ्यांसाठी आता कायदेही बदलले आहेत. भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात मोट बांधून समाज भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी लढा द्या,' असे आवाहन भ्रष्टाचारविरोधी चळवळीतील सक्रिय नेत्या अंजली दमानिया यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम लिखित शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाची संघर्षमय यशस्वी वाटचाल : 'शिवज्योत' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी वसंतराव मगदूम व कांचन मगदूम यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शुक्रवारी कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

दमानिया म्हणाल्या, 'आम आदमी पक्षाच्या माध्यमातून सुरू असलेल्या भ्रष्टाचारविरोधी मोहिमेने मला प्रभावित केले. सध्या जे राजकारण सुरू आहे ते बदलण्यासाठी आपच्या माध्यमातून आम्ही समविचारी एकत्र आलो होतो. मात्र, आमच्या अपेक्षांना साथ मिळाली नाही. भांडवलदारांच्या वर्चस्वाचा फटका समाजातील कष्टकरी, कामगार वर्गाला बसत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यासाठी तत्त्ववादी, व्यवस्थेला कायद्याच्या आधारे धारेवर धरणारे नेतृत्व समाजाला गरजेचे आहे. मगदूम यांच्यासारख्या नेतृत्वाने ही गोष्ट सिद्ध केली आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'मगदूम यांच्या नेतृत्वाचा प्रवास मी जवळून पाहिला आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची अभ्यासू मांडणी हे त्यांच्या आंदोलनाचे यश आहे. त्यांच्या नेतृत्वाचा उल्लेख विद्यापीठाचा इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहे.' मगदूम म्हणाले, '१०३ कर्मचाऱ्यांच्या न्यायासाठी दिलेला लढा, त्याला आलेले यश यातून आयुष्याला समाधान मिळाले.'

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाचे जिल्हाध्यक्ष नारायण पोवार उपस्थित होते. मनोहर कुलकर्णी यांनी मानपत्राचे वाचन केले. संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी प्रास्ताविक केले.

पुढारी

# ज्ञानेश्वर मुळे यांचे आत्मचरित्र शिवाजी विद्यापीठ अभ्यासक्रमात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीयमानवाधिकार आयोगाचे सदस्य ज्ञानेश्वर मुळे यांच्या 'माती, पंख आणि आकाश' या आत्मचरित्राचा शिवाजी विद्यापीठाने अभ्यासक्रमात समावेश केला आहे. बीएच्या दुसऱ्या वर्षातील चौथ्या सत्रात हे आत्मचरित्र विद्यार्थ्यांना शिकवले जाणार आहे.




सी.बी.सी.एस. नुसार अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना या आत्मचरित्राची निवड करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून हा अभ्यासक्रम लागू होणार आहे. माती, पंख, आकाश-जीवनानुभवाचे स्वरूप, शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण, वाङ्मयीन गुणविशेष, आत्म वृत्त लेखनाचे स्वरूपाचा यात समावेश असणार आहे. हे पुस्तक चार विभागात विद्यार्थ्यांना उलघडून दाखवले जाणार आहे. ज्ञानेश्वर मुळे हे अब्दुललाट (ता. शिरोळ) या छोट्याशा खेडेगावातील आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांबरोबर ते सातत्याने संवाद साधत असतात. आत्मचरित्राच्या निमित्ताने ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करता येणार आहे. हे पुस्तक मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व ओरिया भाषेत भाषांतरित करण्यात आले असून कर्नाटक सरकारने या पुस्तकाचा दहावीच्या अभ्यासक्रमात समावेश केला असल्याचे मुळे यांनी सांगितले.

Kolhapur Edition
23 Jun, 2019 Page No. 5
Powered by : erelego.com